**नि.दि.मु.क्र.१४७/२०१४**
**प्रशांत वि हणमंत**
**नि.क्र. ५३ पुढे सुरु**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. डी.एस. शिंदे**

**८.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या गट क्र.१२४९ च्या दक्षिण दिशेला आम्हा वादींची गट क्र.१२१५ ही मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयत रघुनाथ पोळ व माझे पती मंगलसिंह हे कॉटन मिल कामगार होते व ते एकमेकांशी परिचीत होती. साक्षीदार स्वतःहुन सांगते की माझे पती नवसारी येथील मफतलाल मिलमध्ये तर रघुनाथ हे मुंबई येथील सींप्लेक्स मिलमध्ये होते. सन १९८५ मध्ये मिल कामगारांच्या संपाबाबत मला माहीत आहे. त्यानंतर रघुनाथ हे त्यांच्या गावी परतल्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, रघुनाथराव यांना आर्थीक चणचण असल्याने त्यांनी माझ्या पतीकडुन वेळोवेळी थोडे थोडे करुन एकुण रक्कम रुपये ४० हजार हात ऊसने घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रघुनाथराव यांनी त्या व्यवहाराकरिता तारण म्हणुन वाद मिळकतीतील २० गुंठे क्षेत्र लिहुन दिले होते.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीची शासकीय किंमत रक्कम रुपये १ लाख ३० हजार होती व त्यावर योग्य तो स्टॅंप दिलेला आहे व त्याद्वारे दिनांक ०२.०५.१९९७ रोजीचे साठेखत लिहुन देण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील व्यवहाराच्या वेळी प्रतिवादी क्र.१ व त्यांचे वडील रघुनाथ हे शासकीय किंमतीपेक्षा तब्बल ४७ हजार पाचशेचा तोटा सहन करुन तयार झाले हे खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसा तोटा सहन करुन ते त्या व्यवहाराला का तयार झाले त्याचा खुलासा मी करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०२.०५.१९९७ रोजीचे साठेखत माझे पती मंगलसिंह यांनी करुन घेतले होते व त्या व्यवहाराची बोलणी देखील त्यांनीच केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६२ वरील साठेखतावर माझी अथवा माझ्या मुलाची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्या साठेखताच्या वेळी मी व माझा मुलगा प्रशांत हजर होतो असे मी खोटे सांगत आहे.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत गट क्र.१२४९ च्या पुर्वेला शंकर दगडु जाधव

यांची कोणतीही जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या पश्चिम दिशेला शाहु श्रीपती सोनावणे यांची जमीन असल्याचे मी खोटे सांगत आहे. मी शंकर दगडु जाधव व शाहु श्रीपती सोनावणे यांना साक्षीदार म्हणुन तपासणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०२.०५.१९९७ रोजीच्या साठेखतात ज्या चतुःसिमा नमुद आहेत त्या ख-या आहेत असे समजुन त्या प्रस्तुत दाव्यात नमुद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१२४९ च्या पूर्वेला श्री बिरामणे यांची जमीन आहे परंतु त्याबाबत दाव्यातील दावा मिळकतीच्या चतुःसिमेत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुरेश व पुष्पा जायगुडे यांनी दावा मिळकतीच्या ३० गुंठे क्षेत्राच्या उत्तरेला व दक्षिणेला गट क्र.१२४९ मध्येच ऊसाची लागवड केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या चतुःसिमा दाव्यात नमुद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २१.०३.१९९७ च्या साठेखतात नमुद असलेल्या चतुःसिमा दिनांक ०२.०५.१९९७ च्या साठेखतात देखील नमुद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्याच चतुःसिमेच्या आधारे मला कब्जा मिळाल्याचे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत ३० गुंठे क्षेत्र कथीतरित्या माझ्या कब्जात असल्याबाबत मी तशी कोणतीही मोजणी संबंधीत मोजणीदारांद्वारे करुन घेतली नाही.

**११.** मला रघुनाथ यांच्या मुलींविषयी म्हणजेच प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या लग्नाविषयी माहीती नाही तसेच त्यांची लग्ने १९९४-९५ पूर्वी झाले किंवा कसे याबाबत देखील मला माहीती नाही. प्रतिवादी क्र.१ हा सन १९९७ साली पोलिस मध्ये भरती झाल्याबाबत मला माहीती नाही. प्रतिवादी क्र.२ याने त्याचे कॉलेज बी.कॉम मधुन सोडल्याचे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, रघुनाथराव यांना दावा मिळकतीतील कथीत ३० गुंठे क्षेत्र माझ्या पतीला अथवा मला विकण्याची कोणतीही कायदेशीर गरज नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पूवी घेतलेले ६२ हजार ५०० व तद्नंतरचे २० हजार एवढीच रक्कम परत देण्याची जबाबदारी रघुनाथ यांची होती. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम रुपये ८२ हजार ५०० यास तारण म्हणुन दिनांक ०२.०५.१९९७ रोजीचा करार झाला होता. साक्षीदार पुन्हाःहुन सांगते की, तो व्यवहार तारण म्हणुन झालेला नव्हता तर ते दावा मिळकतीचे साठेखत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने रघुनाथराव यांची संमती नसताना देखील तसेच त्यांना कुठलीही आर्थीक अडचण नसताना देखील त्यांच्याकडुन जबरदस्तीने सदरचे साठेखत लिहुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीची शासकीय किंमत १ लाख ३० हजार असताना त्यापेक्षा अत्यंत कमी म्हणजेच रक्कम

रुपये ८२ हजार ५०० ला विक्री करण्यास रघुनाथ कधीही तयार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत रघुनाथराव यांच्याशी माझी अथवा माझा मुलगा प्रशांत यांची प्रत्यक्षात कधीही बोलणी झालेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यात माझे पती पक्षकार नाहीत. त्यांना मी साक्षीदार म्हणुन तपासणार आहे किंवा कसे याबाबत मी आजरोजी सांगु शकत नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब -**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.08.11 13:56:47 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०८.०८.२०२५.

२रे सह दिवाणी न्यायाधीश वाई.